# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. २४/१२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १८९०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चा माहे नोव्हेंबर २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/४६५४ दि.११/१२/२०१८ चे पत्र.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १८९१**

महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम कलम २०८ प्रमाणे करणेत येत असलेल्या कारवाईबाबत अतिक्रमण विभागामार्फत मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ७११ दिनांक २०/१२/२०१७ अन्वये रिमुव्हल चार्जेस आकारणेची कार्यवाही करणेत येत असून महानगरपालिका हद्दीतील अवजड वाहने, हलकी वाहने व इतर वाहने निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर निर्बंध असलेल्या ठिकाणी पार्किंग/उभी केल्याबद्दल वाहने न उचलता जागेवर दंड आकारणीची कार्यवाही वाहतुक पोलिस विभागामार्फत खालील तक्त्यातील नमूद केलेल्या दरानुसार करणेत येत असून सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/८२५ दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

| अ.क्रं. | वाहन प्रकार | तपशील | विशेष आकार |
|---|---|---|---|
| १ | अवजड वाहने | निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर , निर्बंध असलेल्या ठिक़ाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.५,०००/-प्रत्येकी |
| २ | हलकी वाहने | सर्व रस्त्यांवरील ( १० टनापर्यंत वहन क्षमता असलेली ) निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.२,५००/- प्रत्येकी |
| ३ | कार,जीप इ. वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेलया ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्द्ल | र.रू.२,०००/- प्रत्येकी |
| ४ | सहा व तीन आसनी रिक्षा आणि तीन चाकी टेम्पो | बंदी असेलेल्या रस्त्यांवर व निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन संचलन व पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,५००/-प्रत्येकी |
| | | इतर सर्व रस्त्यांवर निर्बध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |
| ५ | इतर यंत्रसामुग्री/रोड रोलर | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल | र.रू.३,०००/- प्रत्येकी |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्द्ल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |

### हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १८९२**

कोथरुड स.नं.१२९ प्लॉट क्र. १५+२अ+३अ येथील शॉपिंग सेंटर आरक्षणापोटी पुणे महानगरपालिकेस ऑफिस स्वरुपात ताब्यात देणेबाबत प्रकरणाची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२२१८ दि. १४/१२/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १९ सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. १८९३**

बांधकाम विभागाकडील खराडी, गंज पेठ, हडपसर, पर्वती, बाणेर, संगमवाडी, वडगांव बु. कोंढवा बु. येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी माहे एप्रिल–२०१८ ते जून–२०१८ मध्ये तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्ताव प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२२१९ दि. १४/१२/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २० सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. १८९४**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१७–१८ या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२२३३ दि. १७/१२/२०१८ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

**विषय क्र. १८९५**

भवन रचना कार्यालयाकडील कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/४२९ दि. २२/९/२००८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २८ सन २००८–२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/८६६ दि.१९/१२/२०१८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १८९६**

प्रभाग क्र. २६ ब मध्ये हडपसर स.नं.५५ येथे फुटबॉल ग्राऊंडचे उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.संजय आनंदराव जांभळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,९२,७२३=५० पेक्षा अॅटपार (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८४,९२,७२३=५० उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,१९,१२६=८२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,७८,०८८=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४०,५८५/– पर्यंत अधिक अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/८१४ दि. १३/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८९७**

पर्वती जलकेंद्र अखत्यारितील सिंहगड रस्त्यावरील बुस्टर पंपिंग चालु बंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री स्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४१,२७,२९२=७१ पेक्षा ७% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून सदर काम ब पाकीट उघडल्याचे दि.२६/४/२०१८ पासून र.रु. ४४,१६,२०३=१९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/८३७ दि. १५/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८९८**

प्रभाग क्र. ८ ड मध्ये रोहन निलय सोसायटी येथील रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमित एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६२,२७,३४१=९३ पेक्षा ०.८१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,७६,९००=४६ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,४७,२८१=०३ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये२५,२५७/– अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८४० दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८९९**

मुकुंदनगर व महर्षी नगर यांना जोडणारा ढगे रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,८६,५७५/- पेक्षा ०.९६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८८,०१,२६३=८८ अधिक प्रचलित दरानुसार वस्तु व सेवाकर जी.एस.टी. १२% र.रुपये १०,६६,३८९/- यानुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस टेंडर अटीशर्तीतीतील मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४६,६४३/-, रॉयल्टी र.रु. ०=०० उपलब्ध तरतुदीनुसार काम करुन घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/८४२ दि. १५/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १९००**

प्रभाग क्र. २६ मधील महमंदवाडी, हांडेवाडी रस्ता फुटपाथ विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रुषभ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,७८,५४९/- पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८६,९१,६४१=३६ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,५३,४२५=९१ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये१,४७,३१५=१५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये२०,२१५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८४६ दि. १५/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १९०१**

प्रभाग क्र. २५ क व ड मधील शांती नगर, सेंट पेट्रीक टाऊन समोरील मुख्य रस्ता, स्वामी विवेकानंद व दिव्या नगर येथील रस्ते डांबरीकरण करणे व विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रुषभ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९०,३५५/- पेक्षा ७.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९१,९१,१३६=५९ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८६० दि.१८/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १९०२**

प्रभाग क्र. ८ जयकर पथ व भाऊ पाटील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व पदपथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दिविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,६०,१६,५०४=७५ पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३१,३३,५३३=८९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये१९,२१,९८०=५७ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये २२,३२४=६५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३४,२३६/- अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८६१ दि.१८/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १९०३**

पुणे पेठ गुलटेकडी येथील व्हेईकल डेपो ची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रशांत एस.तळेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,३३,१८०/- पेक्षा ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,३३,१८०/- उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये०६,५१,९८१=६० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ०२,३१,०९०=९० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १,२१,०७४/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/८६५ दि.१९/१२/२०१८ चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. १९०४**

पुणे मनपाच्या हद्दीमध्ये जागोजागी पडलेला कचरा गोळा करून हायवा २५१६ या प्रकारचे १५ क्यु. मी. क्षमतेच्या टिपर वाहनांनी वाहतुक करणे कामी टेंडर्स मागविली असता मे.बालाजी अर्थमुव्हर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,०००/- पेक्षा पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) असल्याने त्यांचेकडून रक्कम रु.१,१४,९८,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चौदा लाख अठ्याण्णव हजार आठशे पन्नास फक्त) पर्यंत भाडेतत्वावर घेणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८५२ दि. १७/१२/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १९०५**

पुणे पेठ कोथरुड स.नं. १४७, हि.नं.२+१अ व २/ब+३+४+५/अ येथील PMPML & ST साठी आरक्षित असलेली ९ आर व १८ आर क्षेत्र जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/६४८ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९०६**

मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणेकरीता खालीलप्रमाणे वर्गीकरणाने तरतूद र.रू. १२.५० कोटी उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६४९ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक,<br>समाज विकास विभाग,<br>१) पुणे शहरात लाईट हाऊस प्रकल्प सुरू करणे, (FE14D136), पान क्र.१४२.<br>२) पुणे शहरातील रस्त्यावरील मुलांकरीता विविध उपक्रम राबविणे, (FE14C208) पान क्र. १४०.<br>३) आरोग्य विभाग, कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडिकल वेस्ट प्लँट समोरील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे व इतर सुधारणा कामे करणे व विद्युत दाहिनी बसविणे (RE17F236), पान क्र. ६०. | ३०० लाख<br>७५० लाख<br>२०० लाख | ----<br>----<br>---- |
| नविन सुचविलेले काम<br>मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे | ---- | १२५० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९०७**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीचे वर्गीकरणाला मंजुरी देणे ही बाब मा.स्थायी समितीचे अखत्यारीतील बाब असल्याने तसेच प्रशासनाकडे दि.१५.१२.२०१८ नंतर प्राप्त होणाऱ्या वर्गीकरण मंजुरीचे ठरावांवर कार्यवाही करणे प्रशासनास शक्य होणार नसल्यामुळे सदरची बाब मा.स्थायी समितीचे निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाब मा.स्थायी समितीचे व त्यांचेमार्फत सर्व माननीय पदाधिकारी व सभासदांचे निदर्शानास आणून देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७८२ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९०८**

मा.हिमाली कांबळे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. २७/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३६,५०,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. २१८, अ.क्र.४, CE20C541, हडपसर शुटिंग रेंज येथे प्रकाश व्यवस्था करणे. | ३६,५०,०००/- | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे.<br>२) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयी तद्नुंषीक कामे करणे.<br>३) प्रभाग क्र.२१ अ मधील विविध ठिकाणी पोल व दिवे बसविणे.<br>४) प्रभाग क्र.२१ अ मध्ये हायमास दिवे बसविणे. | <br>---<br><br>---<br>---<br>--- | <br>१०,००,०००/-<br><br>१०,००,०००/-<br>१०,००,०००/-<br>६,५०,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१७/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९०९**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे या कामास सन २०१८-१९ साठी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी असल्याने वर्गीकरणाद्वारे या कामासाठी र.रुपये ४६० लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तद्नुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | ४,६०,००,००० | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे या कामाअंतर्गत बजेट हेड (CE20D170/L1-) मधील अ.क्र.५ अलंकार थिएटर जवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे | ---- | ४,६०,००,००० |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१७/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १९१०**

प्रभाग क्र.६ येरवडा पुणे जयजवान नगर येथील डोंगर कठ्ड्यांला गनाईटींग करणे या कामासाठी तज्ञ सल्लगार म्हणून शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय स्थापत्य विभाग यांची नेमणूक करणेस व त्यांचेशी करारनाम करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८३२ दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

१) प्रभाग क्र.६ येरवडा पुणे जयजवान नगर येथील डोंगर कठ्ड्याचे मजबुतीकरण करणे, गनाईटींग करणे या कामाचा प्रकल्प अहवाल व पुर्वगणनपत्रक तयार करणे व वेळोवेळी जागा पाहणी करणे यासाठी तज्ञ सल्लगार म्हणून शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय स्थापत्य विभाग यांची नेमणूक करणेस व त्यांचेशी करारनाम करणेस

२) महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकानुसार अनुज्ञेय होणारी २% एवढी फी शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय यांना अदा करणेस.

**विषय क्र. १९११**

अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील कारवायांसाठी गॅस कटर, क्रॉम्प्रेसर ब्रेकर, मालट्रक व क्रेन पुरविणेकरीता वर्गीकरणाने र.रुपये ६० लक्ष तरतूद उपलब्ध करुन मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/८३६ दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, उप आयुक्त अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग,<br>१) RE25B108, फेरीवाला सर्व्हेक्षण करणे | २२,००,०००/- | --- |
| २) RE25B118, प्रत्येक परिमंडळ कार्यालयीन हद्दीमध्ये स्वतंत्र नव्याने गोडावून बांधणे,सिमाभिंती देखभाल दुरुस्ती CCTV व तदनुषंगिक कामे | ३८,००,०००/- | --- |

| | | |
|---|---|---|
| सुचविलेले काम<br>उप आयुक्त अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, RE25B112<br>अतिक्रमण विभागासाठी भाडेतत्वावर गाड्या व मशिनरी घेणे | --- | ६०,००,०००/- |

**विषय क्र. १९१२**

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील ११ - यांत्रिकी, क- यांत्रिकी स्थापत्य अधिकारी यांचे कार्यालय या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च व सुटे भाग खर्च तसेच ११ - यांत्रिकी, ग- मोटार विभाग या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन या कामी वर्गीकरणाद्वारे र.रुपये ७३० लाख आर्थिक तरतूद उपलब्ध करून मिळणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८५४ दि.१७/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, मोटार वाहन विभाग<br>१)सन २०१८-२०१९, ७- यंत्र सामुग्री व घसरा निधीतुन विकत घ्यावयाची सामुग्री FE 17 A 208 - कचरा व्यवस्थापन अंतर्गत घंटा ट्रक, घंटा रिक्षा इ.घेणे | २१९ लाख | ---- |
| २) सन २०१८-२०१९, ७- यंत्र सामुग्री व घसरा निधीतुन विकत घ्यावयाची सामुग्री, FE17A218 - पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट होणाऱ्या गावामध्ये कचरा वाहतूक करणारी वाहने कॉम्पॅक्टर, डंपर प्लेसर, बीआरसी, घंटागाडया, मैलागाडया, ट्रक्टर, कंटेनर इ. करीता आवश्यकतेप्रमाणे वाहने खरेदी करणे | ५११ लाख | ---- |
| सुचविलेले काम<br>मोटार वाहन विभाग<br>१)२ - पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च RE21A103 | ---- | १४० लाख |
| २) २ अ - सुटे भाग खर्च RE21A103A | ---- | ९० लाख |
| ३) ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/ तांत्रिक सेवकांचे वेतन RE21C104B | ---- | ५०० लाख |

**विषय क्र. १९१३**

पुणे महानगरपालिकेच्या १० सांस्कृतिक केंद्रातील स्वच्छतेच्या कामाची निकड विचारात घेता माहे ऑक्टोंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीतील स्वच्छता कामांची बिले आदा करणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे र.रुपये ६२,६५,०००/- उपलब्ध करुन देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/माव्य/८६४ दि.१९/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, बालगंधर्व रंगमंदिर पुनर्निमाण करणे, CE 28A160/SJ 16-124 | ६२,६५,०००/- | ---- |
| सुचविलेले काम<br>सांस्कृतिक केंद्र विभाग, RE 28A 105, पुणे मनपाची १० सांस्कृतिक केंद्रातील स्वच्छता विषयक मकत्यांची बिले आदा करणे | ---- | ६२,६५,०००/- |

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**